नि.दि.दा.क्र.१११/२०२२
नि.क्र.३२

<u>उलटतपास प्रतिवादींकरीता विधीज्ञ श्री.आर.बी. कोळेकर यांच्या वतीने शपथेवर सुरु-</u>

१. आम्ही ४ भाऊ आणि २ बहिणी आहोत. माझ्या म्हणण्याप्रमाणे मौजे गळनिंब येथील गट क्र.५ ही वडिलोपार्जित मिळकत आहे. वडिलोपार्जित मिळकतींचे वाटप अंदाजे ५० वर्षांपूर्वी झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्या वाटपाची नेमकी तारीख मी सांगू शकत नाही. वाटप झाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा आमच्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीने त्यांच्या बाजूने साक्ष देण्याकामी मला बोलाविल्यामुळे मी साक्ष देण्याकरीता आलो. हे म्हणणे खरे आहे की, वादीने दावा जमीन कोणाकडून मोजून घेतली त्या मोजणीदाराचे नाव मला सांगता येणार नाही. मोजणीदार हा सरकारी कर्मचारी होता की खाजगी माणूस होता हे मला सांगता येणार नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः दावा जमिनीत राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिनीला लागून माझी जमीन नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.५ या जमिनीमध्ये चारीमुळे विभाजन झाले आणि चारीच्या पलीकडे माझी जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी हे हरकत अडथळा करत असल्याबाबतचे मला वैयक्तीक माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, शपथपत्र मी न्यायालयात येण्या आधी तयार करुन ठेवण्यात आले होते आणि न्यायालयात आल्यावर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीचे खरेदीखत झाल्यानंतर माझे दावा जमिनीशी प्रत्यक्ष कधीही संबंध आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला मदत करण्याकरीता त्याच्या सांगण्यावरुन पुराव्यातील मजकूर तयार करण्यात आले.

<u>**उलटतपास पूर्ण.**</u>

<u>**फेरतपास नाही.**</u>

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.11.01 16:16:02 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक ०१/११/२०२५